P.V.G.'s

# Muktangan English School & Jr. College, Pune - 9

## Annual Exam (2024-25)

## Standard - IX

**Subject - MARATHI** — **Marks - 80**

**Date - 28/03/2025** — **Time : 8.00 am to 11.00 am**

### विभाग १ - गद्य (गुण - १८)

**प्रश्न १ (अ) खालील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

माझ्या आठवणीतला, आयुष्यातला सगळ्यात महत्त्वाचा दिवस म्हणजे माझ्या बाई - ॲनी मॅन्सफिल्ड सुलिव्हॅन - मला शिकवायला आल्या तो दिवस. दोन अगदी परस्परविरोधी आयुष्य कशी एकत्र येतात, याचं मला नवल वाटतं. ३ मार्च १८८७. मला आठवं वर्ष लागायला तीन महिने बाकी होते. त्या दिवशी दुपारी मी पोर्चमध्ये उभी होते - शांत, कशाच्या तरी अपेक्षेत. आईच्या खाणाखुणा आणि घरातल्या लगबगीवरून आज काहीतरी वेगळं घडणार ह्याचा मला साधारण अंदाज आला, म्हणून मी दारापाशी जाऊन पायऱ्यांवर वाट पाहत राहिले. अचानक पोर्च झाकून टाकणाऱ्या हनीसकल् वेलीच्या जाळ्यामधून ऊन वाट काढत आलं आणि माझ्या उंचावलेल्या चेहऱ्यावर पसरलं. नकळतच माझी बोटे बाजूच्या सवयीच्या पानांवरून आणि वसंत ऋतूचं स्वागत करायलाच उमलाव्यात तशा कळ्यांवरून फिरली. भविष्यात माझ्यासाठी काय चमत्कार लिहून ठेवलाय, याची काही मला कल्पना नव्हती.

त्याआधी काही आठवडे रागानं आणि कडवटपणानं मन इतकं व्यग्र झालं होते, की त्या स्वत:शीच चाललेल्या सततच्या झगड्यानं मी अगदी थकून गेले होते. दाट धुकं असताना तुम्ही कधी समुद्रावर गेलायत? अशा वेळी वाटतं, सहज स्पर्श करता येईल अशा पांढऱ्या अंधारानं आपल्याला वेढलंय आणि तशा धुक्यातून जहाज वाट काढत किनाऱ्याच्या दिशेनं येत असतं. किनारा गाठेपर्यंत ताण असतो. छाती धडधडत असते. वाटतं, आता काय होणार? शिक्षणाला सुरुवात होण्याआधी माझी अवस्था त्या धुक्यात सापडलेल्या जहाजासारखी होती. फरक इतकाच, की माझ्याकडे होकायंत्र वगैरे काहीच नव्हतं आणि बंदर किती जवळ आलंय, तेही कळायला काही मार्ग नव्हता. 'प्रकाश! प्रकाश हवाय मला!' असं माझ्या आत्म्याचं नि:शब्द आक्रंदन चालायचं. नेमक्या त्याच हव्याशा क्षणी प्रेमाच्या प्रकाशात मी न्हाऊन निघाले.

**१) आकृती पूर्ण करा** **(१)**

| काही आठवडे या भावनांनी हेलन केलर यांचे मन व्यग्र होते - | |
|---|---|
| | |

**२) चौकटी पूर्ण करा** **(२)**

१. हेलन केलरच्या आयुष्यातील महत्त्वाचा दिवस - [ ]

२. हेलन केलर यांच्या शिक्षिकेचे नाव - [ ]

**३) एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

१. शिक्षणाला सुरुवात होण्याआधी हेलन केलर यांची अवस्था कशी झाली होती?

**४) स्वमत:** **(३)**

दिव्यांग व्यक्तीला तुम्ही कशी मदत कराल? याविषयी थोडक्यात माहिती लिहा.

**प्र. १ (आ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या कृती करा.**


झाडाखाली मुंग्याचंही एक वेगळंच विश्व होतं. अनेकरंगी किडेसुद्धा त्या दलदलीत होते. एकदा पाहत असताना सापाची कात आढळून आली. झाडांवर खारीची वस्ती तर होतीच; पण थंड सावलीत कुत्रीही तिथं विसाव्याला येत. फुलांपासून ते फळांपर्यंतचा सगळा जीवनप्रवास त्या झाडाचा मला पाहायला मिळाला नाही; परंतु शेवटच्या बहरात फुलं लागलेली पाहिली. ही फुलं चिमुकली, मंद गोड वासाची आणि अद्‌भुत फळदार आश्वासन घेऊन आलेली असत. फुलांमुळं लवकरच त्या झाडाभोवती पंखधारी चिमुकल्या पऱ्या उडू लागल्या. फुलपाखरं आणि रंगीत उडते कीटक. फुलचुखे चिमुकले पक्षी आणि भुंगे. एका छोट्या फांदीवर मधमाश्यांचं पोळंही रचलं जाऊ लागलं. तेव्हा मात्र खिडकी लावून घ्यावी असं वाटू लागलं. पण त्या माश्यांनी कधी कुणाला दंश केला नाही.

'सजीवांसाठी जीवनदायी केंद्र' अशी त्या लिंबाच्या झाडाची व्याख्या झाल्याचं माझ्या लक्षात आलं; पण इतकंच नव्हे तर, माणसंही त्या झाडाकडं आकर्षित होत होती.

ज्या कुण्या दाक्षिणात्य स्त्रीनं हे लिंबाचे झाड राहत्या घराच्या मागं केवळ भाडेकरू असताना लावलं होतं, तिनं त्या झाडाला कुंपणं घातलं नव्हतं. मुक्त-मोकळं झाड, तिनं जणू कद्रूपणाच्या आणि कंजुषीच्या मर्यादा घातलेल्या नव्हत्या. आसपासचे लोक येत, लिंबाची फळं मुक्तपणे घेऊन जात. फळं कधी कमी पडली नाहीत, फळांनी लगडलेलं ते झाड दृष्ट लागण्यासारखं, समृद्धीची भावना जागणवणारं आणि जीवनदायी होतं... सगळ्यांसाठीच!

म्हणजे असं की, माणसं, पशु-पक्षी, कीटक, साप, कुत्री आणि खारी, गोगलगाई अशा सगळ्यांनाच ते आकर्षून घेत असे. भोवतालच्या काहिलीतलं विसाव्याचं आणि आनंदाचं जणू आशीर्वादमय आश्वासन आणि जगण्याचा दिलासा...

**१) खालील आकृतिबंध पूर्ण करा** **(२)**




**२) एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

१. लेखकाने केलेली लिंबाच्या झाडाची व्याख्या कोणती?

२. लिंबाचे झाड कोणी लावले होते?

**३) स्वमत-** **(३)**


झाडांचे महत्त्व तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. १ (इ) खालील अपठित उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

विद्यार्थी जीवनात चांगल्या सवयींना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. चांगले साहित्य वाचणारा, योग्य त्याच बाबी लक्षात ठेवणारा, योग्य ठिकाणी खर्च करणारा, आवश्यक असेल तेवढेच बोलणारा, नेहमीच इतरांच्या मदतीसाठी तत्पर असणारा विद्यार्थी भावी आयुष्यात समाजात आपली वेगळी ओळख निर्माण करतो. त्याने निवडलेल्या क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी त्याला विशेष मेहनतीची आवश्यकता पडत नाही.

तुम्ही जोपर्यंत मार्गदर्शन मिळवण्यासाठी स्वत:हून पुढाकार घेणार नाहीत, तोपर्यंत तुम्हाला कोणाचेही मार्गदर्शन मिळणार नाही. आपल्याला काय करायचे याची दिशा दुसरा ठरवणार नाही. तुम्हालाच दिशा ठरवायची आहे आणि तुम्हांलाच त्या दिशेने चालायचेही आहे. हे स्वप्रयत्नानेच शक्य आहे. चांगल्या सवयी केवळ स्वप्रयत्नाला चालना देत नाहीत, त्या केवळ ध्येय गाठून थांबत नाहीत, तर त्या संपूर्ण मानवी गुण वृद्धिंगत करण्यास मदत करतात.

**१) आकृती पूर्ण करा.** **(२)**




**२) चांगल्या सवयीमुळे होणारे फायदे लिहा.** **(२)**

## विभाग २ - पद्य (गुण - १६)

**प्र. २ (अ) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

काया मातीत मातीत तिफन चालते तिफन चालते
ईज नाचते थयथय ढग ढोल वाजवते

नंदी बैलाच्या जोळीले सदाशीव हकालते
वटी बांधून पोटाले पाराबती उनारते
वटी पोटाले बांधते झोयी काटीले टांगते
झोयी काटीले टांगते त्यात तानुलं लळते
त्यात तानुलं लळते ढग बरसते

काकरात बिजवाई जसं हासरं चांदनं
धरतीच्या आंगोपांगी लाळानौसाचं गोंदनं
सरीवरी सरी येती माती न्हातीधुती होते
तिचा कस्तुरीचा वास भूल जीवाले पाळते
भूल जीवाले पाळते वाट सांजीले पाहेते

मैना वाटुली पाहेते राघू तिफन हानते
राघू तिफन हानते ढग बरसते

वला टाकती तिफन शितू वखर पाहेते
पानी भिजलं ढेकूल लोनी पायाले वाटते
काया ढेकलात डोया हिर्व सपन पाहेते
डोया सपन पाहेते काटा पायात रुतते
काटा पायात रुतते लाल रगत सांडते हिर्व सपन फुलते
हिर्व सपन फुलते ढग बरसते

**(१) कवितेत आलेल्या वऱ्हाडी बोलीतील शब्दांना प्रमाण भाषेतील शब्द लिहा.** **(२)**

| वऱ्हाडी शब्द | प्रमाण भाषेतील शब्द |
|---|---|
| १. ढेकूल | |
| २. काया | |
| ३. वटी | |
| ४. झोयी | |

**(२) चौकटी पूर्ण करा** **(३)**

१) पेरणीसाठी लागणारे बियाणे – ☐

२) शेतकरी पेरणीसाठी वापरतो ते अवजार – ☐

३) शेतकऱ्याच्या पत्नीचे नाव – ☐

**(३)** 'काटा पायात रुतते लाल रगत सांडते हिर्व सपन फुलते
हिर्व सपन फुलते ढग बरसते'

**वरील ओळींचा तुमच्या शब्दात अर्थ लिहा.** **(३)**

**प्र. २ (ब) खालील कवितेचे दिलेल्या मुद्द्यांनुसार रसग्रहण करा.**

**कवितेचे शीर्षक – 'पुन्हा एकदा'**

१. कवी / कवयित्रीचे नाव – **(१)**

२. कवितेचा विषय – **(१)**

३. कवितेतील आवडलेल्या दोन ओळी– **(२)**

४. कवितेतून मिळणारा संदेश – **(२)**

५. खालील शब्दांचे अर्थ लिहा. **(२)**

१. वारा – २. युवक –

३. भूमी – ४. वीज –

## विभाग ३ - स्थूल वाचन (गुण - ६)

**प्र. ३ खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(६)**

१. **टिपा लिहा (कोणतीही एक)**

१) ग्रँड कॅनॉल

२) विश्वकोशाची निर्मितीप्रक्रिया

२. केशभूषेचे उद्‌देश सांगून त्यात कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो, ते स्पष्ट करा.

३. विश्वकोश पाहण्याचे तुम्हाला लक्षात आलेले फायदे लिहा.

## विभाग ४ - व्याकरण (गुण - १६)

**प्र. ४ (अ) खालील नामांचे सामान्यरूप लिहा.** **(२)**

१. वडील - ३) पुस्तक -

२. पाणी - ४) डोंगर -

**(ब) खालील वाक्यांचा काळ ओळखा** **(१)**

१) मुलांचा अभ्यास झाला.

२) आकाशात सूर्य तळपतो.

**(क) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **(१)**

१) आठवण - २) फूल -

**(ड) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(१)**

१) ऊन X २) खरे X

**(इ) अचूक शब्द ओळखून लिहा.** **(१)**

१) १) संमारंभ २) समारंभ ३) समांरभ ४) समारंभं.

२) १) परकाश ३) प्रकाष ३) प्रकाश ४) परकाष.

**(त) अधोरेखित शब्दांची जात ओळखा (कोणतेही एक)** **(१)**

१) <u>मी</u> काल नवे पुस्तक खरेदी <u>केले</u>.

२) शाळे<u>समोर</u> मोठे <u>मैदान</u> आहे.

**(थ) खालील शब्दांचे वचन बदला.** **(१)**

१) खिडकी - २) हात -

**(द) खालील शब्दांचे लिंग बदला.** **(१)**

१) मुले    २) लेखक –

**(ध) खालील सामासिक शब्दांचे समास ओळखा.** **(२)**

१) घरदार –    २) कृष्णार्जुन –

३) चारपाच –    ४) गावोगाव –

**(न) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करून वाक्य पुन्हा लिहा.** **(१)**

१) अरे समाज अजून निद्रिस्त आहे

**(ट) खालील वाक्यातील अलंकाराचा प्रकार ओळखा.** **(२)**

१) मेघासारखा तो श्याम सावळा.

२) आईचे प्रेम म्हणजे जणू सागरच.

**(ठ) खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन)** **(२)**

१) दरारा असणे.

२) हिरमोड होणे.

३) स्तुती करणे.

## विभाग ५ - उपयोजित लेखन (गुण - २४)

**प्रश्न ५ (अ) पत्रलेखन-** **(६)**

**चॅम्पियन स्पोर्ट्स**

जलारामनगर, अमरावती – ४४४६०१

**खेळाचे साहित्य मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण**

**खेळाडूंसाठी आकर्षक सवलत**

**शैक्षणिक संस्थांसाठी खास सवलत**

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने क्रीडा साहित्याची मागणी करणारे पत्र लिहा. | **किंवा** | तुमच्या मित्राचा / मैत्रिणीचा धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्याबद्दल तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. |

**प्र. ५ (आ) खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (५)**

१) **जाहिरात लेखन–**

नव्यानेच सुरू झालेल्या 'व्यायामशाळेची' जाहिरात तयार करा.

२) **वृत्तांत लेखन–**

शाळेत साजऱ्या झालेल्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा वृत्तांत लिहा.

३) **कथा लेखन –**

दिलेल्या मुद्द्यांवरून कथालेखन करा. कथेस योग्य शीर्षक द्या.


**मुद्दे :** दोन मित्रांचे जंगलात जाणे – अस्वल येणे – एक मित्र झाडावर चढणे – दुसऱ्याला झाडावर चढता न येणे – त्याचे जमिनीवर हालचाल न करता झोपणे – अस्वलाने हुंगणे – निघून जाणे – झाडावरून उतरल्यावर मित्राने विचारणे – अस्वलाने कानात काय सांगितले? – तात्पर्य.

**(इ) पुढील उतारा वाचून त्यावर आधारित असे पाच प्रश्न तयार करा की, त्यांची उत्तरे एका वाक्यात येतील. (५)**


वेळ ही फार मौल्यवान गोष्ट आहे. म्हणून वेळेचा उपयोग समजूतदारपणे केला पाहिजे. वेळेचा वेग किती? हे कोणालाच सांगता येणार नाही. पण जो वेळचं भान ठेवतो, त्याला वेळेबरोबर निश्चित जाता येते. वेळेचे महत्त्व जाणून जो कामाचे नियोजन करतो, त्याला दैनंदिन कामाव्यतिरिक्त इतर अनेक गोष्टींसाठी भरपूर वेळ देता येतो. वेळेचे महत्त्व जाणणारी माणसे आपल्या छंदाची मनापासून पूर्तता करू शकतात. दिवसभराच्या कामाच्या व्यापातून घरी आलेली व्यक्ती दीड–दोन तास ग्रंथालयात वेळ घालवू शकते. 'वेळ नाही' ही सबब केवळ आळशी माणसेच देतात. कारण त्यांच्याजवळ कामाचे कोणतेही नियोजन नसते. त्यामुळे कामही वेळेवर होत नाही, आणि त्याचा परिणाम म्हणजे अशी माणसे अपयशाची धनी होतात.

**(ई) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर १२-१५ ओळींत निबंध लिहा. (८)**


**१. परीक्षा नसत्या तर...**



**२. नदीचे आत्मवृत्त**




**३. मी पाहिलेले पुस्तकांचे प्रदर्शन**




■■■